


# गुरुवर्य

## गौरवग्रंथ

Scanned with CamScanner

# आमचे जनप्रिय दादा ...



प्रा. डॉ. कविता साळुंके
शिक्षणशास्त्र विद्याशाखा,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

डॉ. बुटे सर आता ३० जूनला सेवानिवृत्त होणार यावर विश्वास बसत नाही. आजही तरूणांना लाजवेल असा त्यांचा उत्साह आणि त्यांची कार्यतत्परता. हसतमुख, सहकारशील वृत्तीचे दादा. कधीही कोणताही प्रश्न उद्भवला तर हक्काच्या नावांपैकी एक नाव. त्यांचा हाक मारतांना ''हं काय म्हणता ताई'' या वाक्यात जाणवणारा जिव्हाळा हृदयाला जाऊन भिडतो. त्यांची '' ताई '' हाक सातत्याने कानात घुमते.

सरांचा शैक्षणिक परिपाठाबरोबरच असलेला सामाजिक परिवारही खूप मोठा. अकोल्याला एका व्याख्यानाच्या निमित्ताने गेले तेव्हा तेथील सहकाऱ्यांकडून त्याबद्दल माहिती मिळाली. सर कीर्तनही करतात. कीर्तनकार आहेत हे ऐकून तर आश्चर्य वाटले. शिक्षक एक बहुरूपी ही उपमा त्यांना अगदी जशीच्या तशी लागू पडते. सरांचे विद्यार्थीही बुटे सर माझे शिक्षक, मार्गदर्शक आहेत हे सांगतांना अभिमानाने त्यांचा ऊर भरून आलेला दिसतो. सरांचेही प्रत्येकाप्रती सातत्याने येणारे गौरवोद्‌गार विद्यार्थ्यांप्रती न आले तरच आश्चर्य. सहकाऱ्यांबद्दल बोलणारे सर आपल्या विद्यार्थ्यांविषयी भरभरून बोलताना दिसतात. त्यांचा आनंद, अभिमान चेहऱ्यावर झळकताना दिसतो.

सरांना प्रश्न असा कोणता नाहीच. त्यांच्या शब्दकोषात 'प्रश्न' हा शब्द डिलीट दिसतो. बऱ्याचवेळा संचालक - समन्वयक बैठकीत काही चर्चा, प्रश्न, वाद निर्माण झाले की सरांनी उठावे आणि, अहो काही प्रॉब्लेम नाही आमच्या महाविद्यालयात आम्ही हे प्रश्न असे सोडवले अडचण म्हणून काही नाही., असे म्हणावे की सर्व सभागृह आश्चर्याने, कुतुहलाने त्यांचेकडे पाहत असे. प्रत्येक नवा प्रयोग कार्यान्वित करण्यासाठी त्यांचा हात सातत्याने पुढे असे.


ISBN-978-93-84801-09-0

एकदा अकोला बी. एड्. कॉलेजला भेट दिली तेव्हा सरांनी स्वत: आपले महाविद्यालय दाखवले. मुक्त विद्यापीठाच्या केंद्रविकास निधीतून आपण अकोला कॉलेजचा कसा कायापालट केला हे सरांनी सांगितले. दाखवले तेव्हा शिक्षणशास्त्र शाखेचे संचालक मा. डॉ. जोशीसरही आश्चर्यचकीत झाले. एखादी उत्साही व दूरदृष्टी असणारी व्यक्ती असेल तर ती निधीचा किती उत्तम वापर करू शकते याचे सर मूर्तीमंत उदाहरण होते. आपल्या स्टाफला मुक्तविद्यापीठातील उद्‌बोधनांचा लाभ व्हावा यासाठी सगळ्यांच प्राध्यापकांना सातत्याने प्रेरणा देऊन सर प्रशिक्षणाला पाठवत. त्यातून महाविद्यालयाला कसा लाभ होतो हे ही ते सांगत होते. ऐकून खूप आनंद झाला. आपल्या स्टाफच्या उन्नतीसाठी सरांची चाललेली धडपड. त्यांसाठी संधीची उपलब्धता व प्रत्यक्ष अनुभव देणारे बुटे सर अनोखेच व्यक्तिमत्त्व.

साधी राहणी पण उच्च विचारसरणी या म्हणीतही सर एकदम परफेक्ट. पेहराव अत्यंत साधा पण नीटनेटका. कोठेही मिरवणे नाही पण सातत्याने सहभाग. यामुळेच की काय अनेक महत्वपूर्ण पदे त्यांनी त्यांच्या कार्यकाळात अनुभवली. अत्युच्च पदी जावूनही आपला मुळ स्वभावाला तडा जाऊ दिला नाही. पण निष्ठेने सातत्याने कार्य केले. कुणालाही दुखावले नाही. सगळ्यासाठीच मदतीला पुढे पण त्यासाठी नियम त्यांनी मोडले नाहीत. नियमांच्या चौकटीत बसून कुणाला कोणता फायदा देता येवू शकतो याचा अगदी बारकाईने अभ्यास सरांचा असे. त्यामुळेच क्वचित प्रसंगी काम झाले नाही तरी त्यांच्यावर कुणी रागावल्याचे आठवत नाही.

एकदा माझे सहकारी प्रा. विजयकुमार पाईकराव यांच्या डोक्यात एक कल्पना आली. जोशी सरांच्या नावे आपण एक पुरस्कार देऊ या ! बुटे सरांना यांबद्दल प्रचंड आदर व प्रेम. त्यांनी लगेच तुम्ही कामाला लागा. मी पुढाकार घेतो. आपण निधी जमा करू असे सांगितले. तेवढ्यावरच न थांबता बराच मोठा निधी पाहता पाहता उभा केला. अर्थात बुटे सरांच्या आव्हानाला इतरांनी प्रतिसाद नाही दिला तरच आश्चर्य. सतत सर्वांसाठी झटणारे, प्रेम करणारे, एक परिवार मानणारे असे हे विशेष व्यक्तिमत्त्व.

शांताराम सरांच्या नावातच शांत स्वरूप राम असा गर्भित अर्थ दिसतो.


ISBN-978-93-84801-09-0

Scanned with CamScanner

तो त्यांच्या व्यक्तिमत्त्वातही जाणवतो. प्रत्येक प्रसंग मग तो कटू असो वा आनंद देणारा. सरांना कधी भारावलेले व डगमगलेले पाहिले नाही. वहिणी सौभाग्यवती सुनंदाताईंना जेव्हा देवाज्ञा झाली, आम्ही सर्व एकदम झालो. वाटले आता एक हसरे, खेळते व्यक्तीमत्त्व आधार गेल्याने कोषात काय ? पण नाही उलट पुढच्या भेटीत सरांनी आम्हालाच आधार दिला. ते म्हणाले, '' ती होती तोपर्यंत तीने मला एवढे काही दिले की माझ्या पुढील आयुष्यात माझा आधार गेला पण कदाचित त्यांची माझी तेवढीच साथ असेल. जशी परमेश्वराची इच्छा.'' सरांची ती वाक्ये आजही आठवतात आणि केवढे धीरगंभीर वाटला. लवकरच पुन्हा ते आपल्या कीर्तनाच्या छंदातून उभे राहिले आणि पुन्हा आले.

सरांबद्दल काय आणि किती लिहावे. खूप प्रसंग आहेत. कारण १९९३ ते २०१७ म्हणजे जवळ जवळ २४ वर्षांचा सहवास औपचारिक नात्यांपेक्षा अनौपचारिक भावा-बहिणीच्या नात्याचा बंध अधिक दृढ झालेला. त्यांच्या नात्यावरून आद्यक्षर काव्य केले आहे ते मी त्यांना अर्पण करते...

शांताराम बुटे -

शांत स्वरूप आत्मा ।
ताऱ्यांप्रमाणे चमकणारा।
राजाप्रमाणे राज्य करणारा।
मनामनात स्थानबद्ध झाला ।
बुरूजांप्रमाणे आधार देणारा।
टेकवूनी माथा जनप्रिय झाला ।

अशा आमच्या जनप्रिय दादांना माझा प्रणाम. पुढील काळात त्यांना उत्तम आयुष्य व सुख, शांती लाभावी अशी ईश्वरचरणी प्रार्थना !


ISBN-978-93-84801-09-0

# निगर्वी, प्रेमळ गुरुवर्य ...



प्रा. विजयकुमार पाईकराव
शिक्षणशास्त्र विद्याशाखा,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

प्राचार्य डॉ. शांताराम बुटे सरांशी माझा जवळ जवळ १९९६ पासूनचा संपर्क आहे. केवळ एक प्राध्यापक, प्राचार्य व लेखक, समिती सदस्य म्हणून नव्हे तर एक अत्यंत प्रेमळ, निगर्वी सदा हसतमुख व सहकार्यशील व्यक्तिमत्त्व म्हणून मला त्यांच्याबद्दल मन:स्वी आदर आहे. व्यक्ती म्हणूनही ते तेवढेच महान आहेत त्यामुळे इतक्या वर्षानंतरही त्यांच्याशी झालेल्या माझ्या विद्यार्थी दशेतील प्रारंभीच्या भेटींचे प्रसंग ही जसेच्या तसे आठवतात.

डी.पी.ई.पी. प्रकल्पासाठी औरंगाबाद येथे जनसंपर्क अधिकारी पदाच्या मुलाखतीसाठी मिपा मध्ये मा. श्री भूषण गगराणी, डॉ. बुटे सर आणि अन्य सदस्या समोर माझा अर्ज आला तेव्हा प्रथम दर्शनीच ते म्हणाले '' अहो मी तुमची निवड फोस्टर डेव्हलपमेंट अध्यापक महाविद्यालयात केली आहे. ते महाविद्यालय चांगले आहे. तेथे रूजू व्हा. हा त्यांचा सल्ला त्यावेळी मनाला कसातरी वाटला. पण आज त्यांची दूरदृष्टीता जाणवते. त्यानंतर फोस्टर डेव्हलपमेंट अध्यापक महाविद्यालयात मी अधिव्याख्याता म्हणून रूजू झालो. कालवश प्राचार्य डॉ. गंगाधर पाथ्रीकर ह्यांच्याशी सदर महाविद्यालय निगडीत असल्यामुळे विद्यापीठ समिती व शासकीय समिती ह्यांची भिती कधी वाटत नव्हती. पण व्यवस्थित पारदर्शी कार्यानंद असावा असा पूर्वीपासूनच ध्यास होता. त्यामुळे बी. एड्. बरोबरच एम. एड्. चेही कार्य करण्याची संधी त्यांच्या समितीने १७ ऑगस्ट १९९७ रोजी दिली. त्यांची विविध कार्यानंदाची कार्यपद्धती कधी गंगेप्रमाणे शांत, संथ, धीरगंभीर होत तर कधी कधी आपल्याच नादात, आपल्याच तालात अखंडपणे, अव्याहतपणे सुरूच असते. शासकीय अध्यापक महाविद्यालय, अकोला येथे अभ्यासकेंद्र मागणीचे विनंती अर्ज सरांनी स्वतःच्या अक्षरात रात्री ८ वाजता लिहिला अन् तेव्हाच जावक नोंद


ISBN-978-93-84801-09-0

Scanned with CamScanner